Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 5, December 2023; Pages 44 – 49
DOI: 10.5281/zenodo.10072360

Original Research Article

# जागतिक शांततेसाठी महात्मा गांधीच्या विचाराची उपयुक्तता

प्रा. संदीप भानुदास गवते

सहाय्यक प्राध्यापक, सैनिकी शास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड ४३१७१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sandeepgavate@gmail.com

Received: 03 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधीची विचार करण्याची पध्दत सर्वकष होती. त्यामुळे त्यांच्या एकेक मुद्दा घेऊन विचार करणे कठीण आहे. बॅरीस्टर गांधीनी दक्षिण अफ्रिकेत असतानांच अनेक संकल्पना आपल्या मनात आकार दिला. त्यापैकी ब-याचशा कल्पना त्यांनी हिंद स्वराज्य या आपल्या गुजराती आणि इंडियन होमरूल या इंग्रजी अनुवादात मांडल्या आहेत. गांधीनी स्वतः यापुस्तकातील सर्वात महत्वाचा विचार स्वराज्य म्हणजे काय? हा आपल्या पुढील आयुष्याच्या बाजूला ठेवला म्हणजे सोडून दिला नाही. तर एका अर्थाने त्यांनी धडा घालून दिला आणि तो आपल्यासाठी ठेवला. त्या संवादातील वाचक म्हणजे श्यामजी वर्मा आणि विनायक दामोधर सावरकर ही जोडी! ते स्वराज्याची व्याख्या ते इंग्रजाना हाकलून देऊन हिंदी लोकांनी भारतावर राज्य करणे अशी करतात. तर इंग्रजांनी स्वीकारलेली आधुनिक जीवन पध्दतीच कशी हानीकारक आहे हे संपादक म्हणजेच गांधी विचार दाखवतो.

या अधुनिक जीवन पध्दतीची जी उदाहारणे गांधीना घेतली आहेत. तो प्रथमदर्शनी हास्यास्पद वाटतात. डॉक्टर, वकील आणि रेल्वे यांचा आपण आपल्या जीवनात इतक्या सहजतेने स्विकार केला आहे की, जणू त्याच्याशिवाय जीवन अशक्य आहे. डॉक्टर आणि वकील हे कोणत्याही उदात्त हेतुने नव्हे तर निव्वळ पैसे कमवण्यासाठीच आपला व्यवसाय करतात ही गांधीची भूमीका हा आरोप शंभर वर्षापुर्वी जसा योग्य होता त्याहून किती तरी अधिक पटीने आज खरा आहे. वकीलाला खरे तर न्यायालयाला सत्य हुडकुन काढण्यास मदत करणारा न्याय संस्थेमधील एक सहभागी घटक अशी मुळ कल्पना परंतु लोभापायी वकील कलागती लावण्यापासून खोट्या बनावट पुराव्या आधारे येनकेन प्रकरणे अशिलाला जिंकून कसे द्याचे पाहत असतात.

दक्षिण आफ्रिकेत वकीली करत असताना बॅरीस्टर गांधीनी कटाक्षाने रस्त्यावर आधारीनेच काम केले असेल तरीही त्यांना वकीलांची चालाखी त्यांनी पाहिली होती. त्यांचे जवळचे स्नेही पारशी दस्तमजी यांनी काही कर बुडवले होते म्हणुन ते गोत्यात आले होते. गांधीनी त्यांना आपला दोष कबुल करण्यास भाग पाडले आणि तरच आपण तुरुंगवासा सारखी पुढील शिक्षा न होण्यात वकील म्हणून मदत करण्याचे कबुल केले. भारतातील आजची परिस्थीती वेगळी नाही.

**महत्वाचे शब्द:** जागतिक शांतता, महात्मा, गांधी, गांधी प्रणीत विचार

### हिंदु स्वराज्याची प्रस्तुतता

स्वराज्य म्हणजे स्वताःवर अवलंबुन राहणे ताबा मिळवणे, प्रत्येक व्यक्तीने समाजायचे ही गांधीजीची महत्वाची भुमीका. माणसाची निर्मीती ही त्याचे हातपाय जिथे सहज पोचतील तितक्या अवकाशातच त्याने हालचाल करावी अशी झाली आहे. आपण निसर्गावर म्हणजे पर्यायाने निर्मात्यावर कुरघोडी करु पाहत आहोत. हे हिंद स्वराज्य मधील आदर्श गांधीचे गुरूतुल्य प्रोफेसर गोपाळ कृष्ण गोखले यांना पटवता आले नाहीत. वारस समजले जाणारे जवाहारलाल नेहरू यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि पुढे त्यातील विचार चक्क नाकारले. स्वतः गांधीजीनी आपल्या आदर्शांना मुरड घालुन इंग्राजाकडून आलेली तथाकथीत लोकशाही ही स्वराज्यातील प्राथमिक टप्पा म्हणून स्विकारली.

हिंद स्वराज मध्ये गांधीजीनी मांडलेला दुसरा महत्वाचा मुदा सावधानसुचीतेचा जसे बीज पेरले तसेच ते उगवेल. हा वास्तविक निसर्ग नियम परंतु येनकेन प्रकरणे आपले साध्य प्राप्त करून घेणे हाही विचार त्याकाळात पसरत होता. गांधीजी इ. स. १९०६ साली जोहान्सबर्ग येथील ११ सप्टेंबरच्या सभेत असहकाराच्या कल्पनेला वचनबध्दतेचे स्वरूप दिले. गांधीनी हिंद स्वराज मध्ये मानवाला मुळ धर्म हा हिंसा नसुन प्रेम हाच आहे हे मांडले. हिंसेने हिंसा वाढते, प्रेमाने प्रेम वाढते हा त्यांच्या सत्याच्या प्रयोगाचा गाभा ठरला. दक्षिण आफ्रिकेतील त्यांचे विरोधक जनरल स्मटस अनेक वर्षानंतर गांधीवर लेख लिहीला त्यात गांधीच्या या गुणाचा त्यांनी आदरच केला आहे. मी स्वतः दुर्भागी म्हणून अशा थोर व्यक्तीचा विरोध करावा लागला अशी कबुली दिली आहे.

### गांधी प्रणीत विचार

गांधी विचारात अहिंसेला फार मोठे महत्व आहे. आज जगात हिंसा वाढत आहे. आज प्रत्येकाला वाटते की लष्करी शक्तीने धडा शिकवला पाहिजे पण इतिहासात अलेक्झंडर आणि नेपोलियन वीर पुरूष होऊन गेले. त्याना अखेरीस पराभव पत्करावा लागला तरी त्यांचा इतिहासात योध्दा म्हणुन गैरव केला जातो. आज अमिरेकेने आपल्या महत्वकांक्षे पोटी व्हिएतनाम, इराक, अफगानिस्तान ह्या देशात ब-याच प्रमाणात हस्तक्षेप केला म्हणून त्यांच्या राष्ट्रध्यक्षांना कोणी वीर पुरूष म्हणत नाही. संयुक्त राष्ट्र संघ इंटरनॅशनल फोर्ट ऑफ संस्थेस अशा संस्था निर्माण करून जगातील प्रश्न हे युध्दा शिवाय कसे सुटतील ह्याचा आपण विचार करत आहोत. महात्मा गांधीजीनी अहिंसेसाठी अग्रह धरला होता. संयुक्त राष्ट्रसंघाने २ ऑक्टोबर हा शांतता दिन म्हणून जाहीर केला आहे. हिंद स्वराज्य मध्ये मांडलेले त्यांचे विधान माञ त्यांच्या समक्ष खोटे ठरले. निवळळ एका धर्मावर आधारलेले राष्ट्र आवश्यक नाही असे त्याचे विधान परंतु पाकीस्तान आणि इजराईल या दोन एक धर्मीय राष्ट्राचा उदय हा त्यांच्या हयातीतच झाला तरी त्यांच्याच शिकवणीकी मुळे भारत हा देश सर्वधर्मीय राहीला ही महत्वाची बाब आहे.

महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेत असतानाच सर्वधर्म समभाव ही संकल्पना त्यांच्या मनात आणि आचरणात पक्का झाली. वैष्णव आणि जैन या दोघांच्याही आहाराचा प्रभाव त्यांवर प्रभाव होता. त्यांची आई पुतळाबाई हिच्यावर वैष्णवी पंथाचे संकार होते. वडील पारशी, मुसलमान आणि जैन मंडळीशी धर्मा विषयक चर्चा करत. गांधीजीची असा विचार होता की प्रत्येकाने आपला जन्मजात धर्म सोडू नये कारण त्या धर्माचाही पाया नैतिकतेचा अव्हेर करणे तसे न करता आपल्या धर्मात आपल्याला न पटणारे काही घातक रिवाज आढळल्यास त्याचा त्याग करावा. या त्यांच्या निष्टेमुळे ते स्वतःला सनातनी हिंदु म्हणवून घेत इस्लाम, खिश्चन, झरोस्ट्रियन, नवबैध्द आणि जैन सर्व धर्मातील आवडलेली तत्वे ते स्विकारू लागले. धर्म न बदलता ही ख्रिश्चन, पाद्री, मुसलमान मौलवी आणि सर्व धर्मगुरू त्याना जवळचे मानु लागले.

**मातृभाषेचा आग्रह**

सर्वधर्म समभावानुसार सर्व भाष समभाव हे ही धोरण त्यांनी दक्षिण आफ्रिकेतच रुजवले. इ. स. १९०३ पासून त्यांनी डरबन जवळ फिनीक्स येथे एक वहसात सुरू केली होती. तिथून इंडियन ओपिनियन हे नियतकालीक छापले जात होते. इ. स. १९०६ मध्ये सत्याग्रहाच्या कल्पनेने मुळ धरले आणि इ. स. १९०८ मध्ये ते स्वतः तुरुंगवास भोगुन आले. इ. स. १९११ मध्ये जोहान्सबर्ग जवळ ट्रॉवस्टॉय फार्म वसवले गेले. या दोन्ही आश्रमात मुलांच्या शिक्षणाची सोय केली ती त्यांच्या मातृभाषेत तामीळ, तेलगू, गुजराथी, उर्दु अशा भाषातुन शिक्षण देण्यासाठी बरीच खटपट करावी लागली होती.

**सर्ववंश समभाव**

शंभर वर्षापुर्वी इंग्लड, हिंदुस्थान, दक्षिण आफ्रिका या वेगवेगळया पार्श्वभुमीच्या देशात गांधीनी वास्तव्य केले होते. त्या काळी निरनिरीळया वंशाच्या लोकांनी एकत्र राहणे ही दुर्मीळ गोष्ट होती. गांधीच्या परिचयात त्या काळी अरब, जर्मन, इंग्रज, रशियन पठाण असे अनेक वंशातील लोक होते. काही त्यांच्या घरीही राहत. वीस वर्षाच्या त्यांच्या प्रदीर्घ वास्तव्यात हरमान कालनबाख हे जर्मन ज्यु आर्कीटेक होते. तर पोलाक हे ख्रिश्चन इंग्रज होते.

फिनिक्स आणि टॉलस्टाय येथील वसाहतीत एका आंतरराष्ट्रीय व आंतर वंशीय सहजिवनाचा प्रयोग चालत असे यात वांशिक जेष्ठत्व किंवा कृतिष्ठत्व यांना स्थान नव्हते. पोलॉक आणि कालनबाख हे बॅरीस्टर गांधीच्या खांद्याला खांदा लावून सत्याग्रह चळवळीत सामील होते आणि त्या वसाहातीतील हिंदी रहिवाशांच्या कार्यासाठी तुरूंगातही जाऊन आले होते. एकूण जगात वंशभेद जायला बराच काळ जावा लागला आज ही काही आपवाद अनुभवस येतात. तरी या सुधारणेची सुरवात दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहापासून झाली असे समजायला हरकत नाही.

जॉन रस्कीन यांचे ऑस्ट्राडिस लास्ट हे पुस्तक गांधीजीनी वाचले आणि एक अनहुत आणि अनपेक्षीत घटना घडली रस्कीन यांनी मांडलेले विचार हा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांनी फिनिक्स वसाहातीची स्थापना केली. त्याशिवाय प्रत्येकाने आपल्याला दिलेल्या जागेत शेती बागाईत करुन उदरनिर्वाह करावा या व्यवस्थेत समतेचे तत्व होते. म्हणून सर्वोदयात स्वतः कष्ट करून हात मातीत काळे करून कमाई करणे हे दुसरे तत्व होते. तोवर वेलफेअर स्टेटचे पुरस्कर्ते बहुसंख्याचे भले करणे ग्रेटेस्ट गुड ऑफ दी लार्जेस्ट नंबर हे शासनाचे उदिष्ट मानीत या जुन्या कल्पनेला छेद देणारे सर्वोदयाचे तत्व होते. मार्क्सवादाचे तत्व की प्रत्येकाकडून कुवतीनुसार आणि प्रत्येकाला त्यांच्या जरुरी इतके हे तत्व या फिनिक्स प्रयोगात रुजले.

सर्वधर्म समभाव सर्वभाषा समभाव सर्ववंश समभाव सर्वोदय या सारख्या संकल्पनाचा उदय जरी दक्षीण आफ्रिकेत झाला असला तरी त्यांचा प्रत्यक्ष उपयोग हा भारतातील राजकारणात अधिक प्रकर्षाने जाणवतो. ब्रम्हचर्य या त्यांच्या संकल्पनात फक्त शरीरसंबंध टाळेण एवढाच हेतु नव्हता अपरिग्रह अस्तेय या जैन वंशश्रेष्ठत्वाने पुरूषी अंहकाराने अशा कोणत्याही कारणाने माणसाकडे काही विशेषत्वाने असल्यास त्याचा उपयोग इतरांसाठी करण्यात पुरूषार्थ आहे असा निष्कर्ष आपल्याला काढता येईल.

**आदर्श पत्रकारिता**

आपला संदेश अन्यभाषी भारतीयांकडे पोहोचावा या उद्देशाने गांधीजीनी इंग्रजी व्यतिरिक्त हिंदी, तामीळ व गुजराती या भाषातून इंडियन ओनियन प्रसिध्द करण्यास प्रारंभ केला. गांधीजी म्हणतात की या यंग इंडिया व नवजीवन प्रमाणेच इंडियन ओपिनियन माझ्या जीवनाचा आरसा होता.

पत्रकार गोपाळकृष्ण यांच्या मते गांधीजीची काही खास तत्वे होती. त्यानुसार १) पत्रकारितेची सेवा हे एकमेव ध्येय असावे. २) स्वार्थासाठी केवळ अर्थ प्राप्तीसाठी अथवा धनसंच करण्यासाठी प़त्रकारितेचा वापर करू नये. ३) गांधीजीच्या तत्वानुसार वृत्तपत्र माध्यमाला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणतात. त्याचा उपयोग सत्ता मिळवण्यासाठी करणे अनैतिक आहे. आजच्या काळात ब-याच वृत्तपत्रचे मालक बड्याबड्या कंपन्या, धनिक व राजकीय नेते ह्याचे आहेत. राजकीय पक्षातर्फे देखिल वृत्तपत्रे चालवली जातात त्याचा वापर करून आमदार, खासदार व मंत्री झालेल्याची उदाहारणे आपल्या समोर आहेत.

वृत्तपत्र स्वातंत्र्य खास अधिकार आहे आणि तो कोणत्याही देशाने कधीही गमावता कामा नये. एकदा का दबावाला बळी पडले की, कायमची ती सवय लागते व सत्याचा शोध घेण्याचे धाडस राहत नाही. थोडक्यात पत्रकारितेचे मुळ उदिष्ट हे सेवा व अन्याला वाचा फोडणे हे आहे. गांधीजीना अभिप्रेत होती ती जबाबदार व विश्वासर्ह पत्रकारिता इंडियन ओपिनियनचा त्यांनी सत्याग्रह व नागरी सहकार या दोन कारणासाठी उपयोग केला. जातीय दंगलीचे वार्ताकन करतांना अतिशयोक्तीचे वर्णन कसे टाळायचे याबाबत गांधीजींना भाष्य केले होते. गांधीजीनी सुचविले होते की, संबंधीत वृत्तामुळे जातीय दंग्याना चिथीवणी मिळाली की नाही याची शहनिशा करण्यासाठी एक संयुक्त मंडळ असावे.

**पत्रकारीतेची नैतिक मुल्य**

गांधीजी हाडाचे पत्रकार होते. त्यांनी यंग इंडिया, हरिजन, हरिजन बंध, हरिजन सेवक व नवजिवन या पाच नियतकालीकाचे संपादन केले. त्यातुन विपुल लिखान केले. त्यात त्यांनी जपलेली पत्रकरितेची मुल्य सुचिता आजही मोलाची ठरते. गांधीजीच्या विचारांवर योरो टॉस्टॉय, ग्लॅडस्टन, रस्कीन, इमर्सन, दादाभाई नौरोजी यांच्या विचारांचा प्रभाव होता. इंडियन ओपिनियन मध्ये पहिल्या दोनवर्षात त्यांनी तब्बल पाचशे लेख लिहीले. या लेखातुन त्यानी आरोग्य स्वच्छता, सत्याग्रह, नागरी असहकार आंदोलन आदी असंख्य विषयावर भाष्य केले. नागरी असहकार वा कोणत्याही प्रत्यक्ष कृती न करता केवळ आज्ञा न जुमानता केलेला विरोध (पॅसिव्ह रेझिस्टन्स) याबाबत नेमके काय शब्द वापरावेत यासाठी त्यानी सुचना मागवल्या त्यातील पॅसिव्ह सेझिस्टन्सला सुचवण्यात आलेली पर्यायी शब्द होता सदाग्रह पण गांधी म्हणाले की, त्या पेक्षा सत्याग्रह योग्य आहे. पुढे गांधीजीनी कठीण परिस्थितीत यंग इंडियाचे संपादकत्व हाती घेतले तसेच ७ ऑक्टोबर १९१९ रोजी नवजीवन व त्यापाठोपाठ यंग इंडिया प्रकाशीत झाला. त्यातुन गांधीजीनी खिलाफत चळवळ, असहकार, स्वदेशी, हिंदु मुस्लिम ऐक्य, अहिंसा नैतिक मुल्य निरनिराळया भारतीय भावांचे महत्व जनतेची जबाबदारी यावर सातत्याने लिखान केले.

१७ फेब्रुवारी १९३३ रोजी हरिजन साप्ताहिकाचा पहिला अंक प्रसिध्द झाला. त्याची किंमत एक आणा होती. त्याचे संपादक आर. व्ही. शास्त्री होते. हरिजन हे नाव मी स्वतः दिलेले नाही असे गांधीनी तक्रार करणा-यांना सांगितले. हरिजनचा अर्थ ईश्वराचा माणूस होय. गांधीजीनी कटाक्षाने हरिजन मध्ये प्रमुख राजकीय बातम्यावर पुर्णपणे बंदी घातली. त्यात विकसीत भाज्याची शेती, मद्याचे महत्व, ग्रामीण भागातील आरोग्य, मलविसर्जन व्यवस्था व स्वच्छता यावर जास्तीत जास्त भर दिला होता. अन्य देशात विकास कसा झाला यावर ही लिखान त्यात असायचे. हरिजन मधील संदेश सर्व भाषेत जावा म्हणून गांधीजीनी ते आठ भाषेत प्रसिध्द करायचे त्यात अहिंसा तत्वाचा कसा वापर करावा यावर गांधीजी सातत्याने भाष्य करत असत. भारत छोडो मोहिमेचा प्रचार आणि प्रसार गांधीजीनी केला तो हरिजन मधुनच.

**विचारप्रणाली आणि समाज परिवर्तन**

गांधीजीनी संपुर्ण आयुष्यात जे काही केले त्यामध्ये प्रयोग पध्दतीचा अवलंब करुन यशस्वीरित्या जी मांडणी स्वतः केली. ती मांडणी आजही जगभर मानली जाते. गांधी विचाराचे लेखक डोनाल्ड टरचेक यांनी म्हटले आहे की, महात्मा

गांधीजीचे कार्य आणि विचार यावर अगणित पुस्तके लिहीली गेली आहेत. ते म्हणतात माझ्या आकलना प्रमाणे गांधी विचारातील केंद्र बिंदु हा व्यक्तीच्या स्वायतते बदलची त्यांची बांधीलकी हा आहे.

व्यक्तीच्या स्वायतेचा सिध्दांत मांडताना म. गांधी व्यक्तीच्या नैतिक आणि जीवशास्त्रीय स्वभावाचा विचार करतात. गांधीच्या मते व्यक्तीच्या मुलभूत गरजांची पुर्तता झाली नाही तर व्यक्ती अस्तित्वाच्या प्रश्नात अडकतात. गांधीजीचे असे मत होते की, भुकेले निराधार लोक नैतिकतेचा दृष्टाकोन स्विकारू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या दुसहास करता कामा नये. त्याच्या मते व्यक्तीत्वाला स्वायत्तता प्राप्त झाल्या शिवाय संबंधीत व्यक्तीचा आणि समाजाचा विकास होऊ शकत नाही. म्हणूनच त्यांनी निर्देशीत केलेली जीवन पध्दती वैयक्ताक व सामाजीक परिवर्तनासाठी उपयुक्त आहे. इतकेच नव्हे तर समाज क्रांतीसाठी आवश्यक असणारी मुल्य व जीवनदृष्टी देणारी सुसंवादी व्यक्तीमत्वे व प्रचंड सामाजिक शक्ती निर्माण करण्याची ताकद त्यात आहे. महात्मा गांधीनी प्रथमच क्रांतीची नवीन व्याख्या केली त्यासाठी वास्तववादी व मानववादी कल्याणासाठी चिरकाल उपयुक्त अशी सत्याग्रहाची संकल्पना मांडली.

गांधीजीच्या समग्रतेच्या भुमिकेनुसार गांधीनी समाजकार्याचा विचार एखाद्या व्यक्तीपुरता किंवा गावापुरता मर्यादित ठेवला नाही. संपूर्ण भारतीय समाजाचा त्यांनी विचार केला. व्यक्तीचा विकास किंवा स्वविकास हा सर्वांच्या कल्याणाचा मार्ग आहे असा विचार त्यांनी मांडला. सर्वांच्या कल्याणासाठी त्यांनी गुजराती भाषेतील सर्वोदय हा शब्द वापरला. सर्वोदयाची संकल्पना रस्कीन यांच्या अन्टु द लास्ट या पुस्तकाच्या प्रभावातुन विकसीत झाली. सर्वांचे कल्याण म्हणजे सर्वांचा उदय याला सर्वोदय असे नाव गांधीनी दिले. व्यक्ती आणि समाज परिवर्तनाची गांधीची संकल्पना व्यापक होती. त्यांच्या समाजकार्याचे स्वरुप व्यक्तीला तिच्या शाररिक दोषापासून मुक्त करून अन्न, वस्त्र व निवारा हे प्रश्न सोडवून व्यक्तीला समाज परिवर्तनाचे साधन बनविणे असे होते. स्पर्धे एवजी सहकार्य आणि बंधुत्वावर आधारीत अहिंसात्मक नवसमाज निर्माण करणे हे त्यांचे उदिष्ट होते. त्यालाच गांधीनी सर्वोदय हे नाव दिले. भारतीय समाजाच्या पुनःनिर्मीतीसाठी आणि सामाजीक न्याय प्रस्थापीत करण्याच्या दृष्टीने सर्वोदयाचा गांधीनी पुरस्कार केला. याच संकल्पना आधुनिक समाज कार्याच्या व्यवसायीक नितीमुल्यातही अभिप्रत आहेत. अंतर्गत सामाजिक न्याय या संकल्पनेचा संदर्भ आढळतो. मानवतावाद हा आधुनिक समाज कार्याचा गाभा आहे. काही विचारवंत यालाच भारतीय मानवतावाद म्हणतात. गांधीनी अखंड मानव कल्याण ही संकल्पना समाज बांधण्यासाठीचा मार्ग म्हणून स्विकारल्याचे दिसते. सर्वोदयी समाजाचा आधार सत्य आणि अहिंसा असेल त्यामध्ये जाती धर्म, भेद याला कोणतेच स्थान नसेल. सर्वोदयी समाज शोषणमुक्त असेल. सर्वोदयात समन्वय आहे. दुबळयांना सबळ करा त्यात आपले कल्याण आहे. दुस-यांना आपले मानल्याशिवाय त्यांच्यात स्वतःच्या कल्याणाची व त्यागाची भावना जागृत होणार नाही. प्रेम व सत्य या शाश्वत मुल्याची प्रकर्षाने प्रतिष्ठापणा केली पाहिजे. गांधीजीच्या विचारप्रणालीतुन या गोष्टी प्रकर्षाने जाणवतात आधुनिक समाज कार्याच्या संकल्पनेत देखील व्यक्तीच्या समस्या सोडविताना व्यक्तीची प्रतिष्ठा हे आधारभूत मुल्य मानले जाते.

रचनात्मक कार्यक्रम या पुस्तकात गांधीनी सांगितलेल्या पंधरा कलमी रचनात्मक कार्यक्रमाचा संदर्भ त्यातील ऐकक कलम अभ्यासले तर लक्षात येते. उदारणार्थ - जातीय धार्मीक ऐक्य, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी, आरोग्य आणि स्त्रियांचे कल्याण, खादी-ग्रामोद्योग, अर्थिक समता ई गोष्टी म्हणजे भारतातील सर्व सामान्य व उपेक्षित लोकांच्या आर्थिक, सामाजीक शैक्षणिक समस्याच्या निवारणासाठीचा व्यापक कृती कार्यक्रम आहे.

**कार्यपध्दती**

गांधीजीना जे यश प्राप्त झाले ते त्यांच्या कृतीशील कार्यपध्दतीमुळे त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा घेण्यासाठी त्यांच्या कार्यक्रमाचा परामर्श घेणे आवश्यक ठरते. इ. स. १९१७ चा चंपारण्याचा सत्यग्रही लढा हे एक उदाहरण लक्षात घेण्या सारखे आहे. त्यांची काम करण्याच्या शैली वैशिष्ट्यपुर्ण होती. प्रथम एक समुह तयार करून मग अन्य समुहांना ते एकत्र करीत प्रामुख्याने मदतकर्ता, मध्यस्थ, चिकीत्सक, प्रोत्साहक म्हणुन गांधीनी भुमीका पार पाडली. नेत्याने

लोकापर्यंत पोहचले पाहिजे हा धडा त्यांनी घालून दिला. लोकशाही समाजरचनेच्या संकल्पनेवर त्यांच्या समाज सेवेच्या कार्यपध्दती आधारीत होत्या.

**सद्यः स्थितीत गांधी विचार**

सद्यःस्थितीत भारतासारख्या विकसनशील देशापुढे अनंत आव्हाने उभी आहेत. त्यांना सामोरे जाण्याचे बळ आजही आपणास गांधी विचारातून मिळते. जागतिकीकरणाला केवळ नवसाम्राज्यवादी कॉर्पोरेट सत्ताचे आक्रमण असे संबोधुन चालणार नाही. पाश्चात्य जगतात निर्माण झालेल्या भांडवलशाही व्यवस्था, साम्राज्यवाद, हिंसक घुसखोरी, उपभोगतावाद या गोष्टी एकमेकांपासून वेगळ्या करता येत नाहीत.

भांडवलशाही साधनांची मक्तेदारी काही मुठभर लोकांच्या हातात नियंत्रीत होते. मग आर्थिक मक्तेदारीच्या आधारे उत्पादन वर्चस्व स्थापन करून अप्रगत, वंचित घटकांचे शोषण केले जाते. या पार्शवभूमीवेर म. गांधीनी मांडलेल्या समग्र व्यवस्था परिवर्तनाचा स्विकार आपण सर्वांनी मिळूण केला तरच सामाजिक प्रश्न सुटू शकतात.

कॉनाफिलकट रेझोल्युशनच्या संदर्भात जेव्हा आपण गांधीजीच्या तत्वज्ञानाला तपासून पाहू तेव्हा उत्तर की गांधीचे तत्वज्ञान हे कॉनाफिलकट निर्माण होणार नाही याची काळजी घेत. गांधी विचारानुसार माणुस हा नैसर्गीक रित्या सहिष्णुताच कायम टिकू शकतो. उग्रवाद हा तात्कालिन व हंगामी असतो. आजच्या कॉग्रेस नेत्यांनी गांधी व नेहरू यांचा विसर पडला आहे. आपण वर्तमानाच्या समस्या घेऊन रस्त्यावर उतरायला हव गांधीच्या विचारांतुन आपण आजच्या समस्याना उत्तर द्याला हवं. समाजासाठी रस्त्यावर येऊन लढतो, प्रश्न सोडवतो तोच गांधीवादी. गांधी हे आधुनिकतेला विरोध करणारे नव्हेत. तर मुल्य शिक्षण देणारे माणुस केंद्री विचारवंत होते. गांधीजीचे अहिंसा हे तत्व हे काही तात्पुरत औषध नाही तर मुल्य आहे. आज ही ते सामाजिक ऐक्याचे बीजारोपन करत राहीले असते. ते कार्यकर्त्यांचे आयुष्य जगले असते आजच्या काळात आपणास गांधीजी हे स्वतः समजुन घ्यावे लागणार आहेत. गांधी ही व्यक्ती नाही तो गतिशील विचार आहे. तो समजावून घेण्याची प्रेरणा निर्माण व्हायला हावी. आपल्यालाही आपल्या स्वतः डोकवावे लागेल. ही एक दीर्घ प्रक्रीया आहे. एका वेळी संपुर्ण गांधी समजुन घेणे कठीण आहे. त्यामुळे आपल्या कृतीतून आत्म्याला साद घालावी लागते.

**संदर्भ सूची**

१. नारायणभाई देसाई, अनुवादः सुरेशचंद्र वारखडे – अज्ञान गांधी समकालीन प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती, २०१३

२. गांधीजींच्या आठवणी – शांतीकुनार मोरारजी स्वामी आनंद अनुवादः अंबरीश मिश्र – राजहंस प्रकाशन पुणे, २०१८

३. गांधीजी आणि त्यांचे टिकाकार – सुरेश व्दादशीवार, ज्ञान साधना प्रकाशन पुणे, २०१८

४. नरहर कुरूंदकर, गांधी, नेहरू व भारतीय राजकारण विषयीचे लिखाण, देशमुख आणि कंपनी पुणे, १९९०

५. गांधीजीचे गारूड संजीवनी खैर, ज्ञान साधना प्रकाशन पुणे, २ ऑक्टोबर २०२१